Impact Factor-7.675 (SJIF)
ISSUE No- (CCCXVIII) 318 (D)

ISSN-2278-9308
September-2021

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar







**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director

**Editor**
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

September-2021

ISSUE No- (CCCXVIII ) 318 ( D)

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Pramod S. Meshram
I/c Principal,
Shri M. H. K. College of
Arts & Comm. Pachal

**The Journal is indexed in:**
Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

Aadhar International Publication Amaravati
**Website** – www.aadharsocial.com **Email** – aadharsocial@gmail.com.

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## September-2021

ISSUE No- (CCCXVIII) 318

## Thoughts and Works of Dr. Babasaheb Ambedkar

Chief Editor
**Prof. Virag.S.Gawande**
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

Editor
**Dr. Pramod S. Meshram**
I/c Principal,
Shri M. H. K. College of Arts & Comm. Pachal

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

| | | |
|---|---|---|
| | डॉ. सखाराम डाखोरे | |
| 37 | 'घडई' कांदबरीतील आंबेडकरी विचार डॉ. संजय शामराव पाटोळे | 172 |
| 38 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार विषय विचार व कार्य संताजी महादेव गावकरे | 176 |
| 39 | ध्यासपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांची पत्रकारिता श्री. संतोष मारुती लोंढे | 179 |
| 40 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा भारतीय साहित्यावरील प्रभाव प्रा. डॉ. शरद खांडेभराड | 183 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणित स्त्री मुक्ती लढा आणि भटक्या विमुक्त जाती जमातीतील स्त्रीया - एक अवलोकन प्रा. सौ. शेख. एस. एम | 187 |
| 42 | स्त्री उद्धारक डॉ भीमरावरामजी आंबेडकर प्रा.बाजुळगे शिवराज पुरुषोत्तम | 193 |
| 43 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरक पत्रकारिता डॉ.शोभा डहाळे | 200 |
| 44 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषीविषयक धोरण आणि कृषी संपन्न संपन्नतेसाठी मांडलेल्या उपायोजना डॉ.सीताराम म्हस्के | 204 |
| 45 | 'उत्थानगुंफा'तून प्रतिबिंबित झालेले आंबेडकरी तत्वज्ञान डॉ.उषा सोरते | 211 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व समतेसाठीचे सत्याग्रह डॉ. उत्तम छाजू राठोड | 217 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य डॉ. वैभवी प्रकाश देहूकर | 222 |
| 48 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक कार्य : एक चिकित्सक अभ्यास" डॉ. विनोद संभाजी सोनवणे | 228 |
| 49 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि हिंदू कोड बील प्रा.डॉ. व्ही. जी.भास्कर | 232 |
| 50 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कामगार सुधारणा प्रा.डॉ.शारदा गोविंदराव बंडे | 235 |
| 51 | दलित वंचितांच्या शिक्षणाविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका डॉ. सतीश कामत | 238 |
| 52 | राष्ट्रनिर्माण में डॉ. बाबा साहब आंबेडकर की भूमिका डॉ. संतोष रायबोले | 241 |
| 53 | महार वतन बील - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन डॉ. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव | 246 |
| 54 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महिलाविषयक दृष्टीकोन व कार्य प्रा. सौ. रश्मी रमेश देसाई | 250 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII ) D
ISSN : 2278-9308
September, 2021

# महार वतन बील - डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय दृष्टिकोन

डॉ. सरवदे संघमित्रा विठ्ठलराव
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग मा. श्री. आण्णासाहेब डांगे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, हातकणंगले जि. कोल्हापूर

जाती संस्थेवर आधारित गावगाड्याचे एक अर्थशास्त्रीय, समाजशास्त्रीय, राज्यशास्त्रीय व मानसशास्त्रीय तत्त्वज्ञान आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतन बील मांडताना या तत्त्वज्ञानाची चिकित्सा केली. वतनदारीने महार समाजाची अपप्रतिष्ठा तर केलीच पण त्यांना लाचार आणि दीनवाणी बनवले होते.

**उद्दिष्ट :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतन बिलासंबंधीची समाजशास्त्रीय व अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेली चिकित्सा स्पष्ट करणे.

**वतनाची व्याख्या :** वतन हा शब्द 'वर्तन' (उपजीवीकेचे साधन) या संस्कृत शब्दापासून निघाला आहे. राहण्याच्या अरबी भाषेत वतन म्हणतात. जातधंदा, वंशपरंपरागत कामे, चाकरी, नेमणूक, उत्पन्न, अधिकार, मानपान, हक्क, वडिलोपार्जित मिळकत, स्थावर अगर स्थावरच्या योग्यतेची मालमत्ता, जन्मभूमी या सर्वांना वतन शब्द लावतात. वतन धारण करणारा तो वतनदार गावाच्या वसुलावर पिकावर, हरजिनसावर देऊळ दर्ग्यासारख्या धर्मादायावर किंवा गावकऱ्याच्या संस्कारांवर, धर्मकृत्यांवर ज्यांचा थोडाफार पिढ्यान्पिढ्या अगर व्यक्तीविशिष्ट निरंतर काही काळापर्यंत हक्क आहे ते सर्व वतनदार होत.[१] थोडक्यात, वतनामध्ये वंशपरंपरेचा हुद्दा व वतनी मिळकत या दोन्ही गोष्टींचा समावेश होतो.

**वतना संबंधित इंग्रजांनी केलेले कायदे :** इ.स. १८३९ चा ॲक्ट २० अन्वये इंग्रजी सरकारने परगणे वतनदाराची चाकरी वजा करून त्यांना नक्त नेमणूका ठरवून दिल्या. पाटील कुलकर्ण्याची चाकरी वंशपरंपरेने कायम करून त्यांना त्यांच्या सर्व परभारे उत्पन्नाबद्दल वसूल रकमेवर रोकड मुशाहिरा ठरवून दिला आहे.[२] चाकरी बद्धल रोख वेतन देण्याची पद्धत चालू झाली. पुढे १८७4 साली वंशपरंपरेच्या हुद्यासंबंधाचा फायदा पास करण्यात आला. साधारण लोकांमध्ये वतनाचा कायदा या नावाने हा कायदा प्रसिद्ध आहे.[3] या कायद्यात वतनदार म्हणजे सरकार उपयुक्त गावकामगार असे सरकारने ठरवून टाकले होते. पाटील, कुलकर्णी, चौगुला, जागल्या व महार हे उपयुक्त गावकामगार म्हणून राखून ठेवण्यात आले होते.

सन १८७४ च्या जुन्या वतन कायद्याच्या काही कलमामध्ये दुरुस्ती करण्यासाठी महार वतन बील मांडण्यात आले.

**महार वतनाचे स्वरूप :** गावगाड्याच्या कारभारात पाटील, कुलकर्णी, चौगुला, जागल्या व महार हे घटक महत्त्वपूर्ण होते. त्यात महारांचे स्थान सर्वात खालचे होते. महारांना मुलकी व फौजदारी स्वरुपाची कामे करावी लागत होती. गावाचा शीव व शेताचा बांध-उरुळया ध्यानात धरणे, त्या न मोडल्या जातील अशी खबरदारी घेणे व त्या बद्दलच्या भांडणात पुरावा देणे, दरोबस्त पिके व खळी राखणे, रात्री काळी, पांढरीत गस्त घालणे, गावाचा वसुल तहसिलात घेवून जाणे, अधिकारी गावात आल्यावर त्यांची सोय करणे, अशी प्रशासकीय कामे याशिवाय चावडीपुढील व गावाचे रस्ते झाडणे, गाव साफ ठेवणे, मेलेले जनावर ओढणे, मयताचा निरोप देणे, याशिवाय घरकी कामेही त्यांना करावी लागत होती. थोडक्यात, गावातील जेवढी त्रासाची, घाणीघुणीची व उन्हातान्हातील कष्टाची अशी कामे त्यांना करावी लागत होती. विशेष म्हणजे, महारांना ही कामे जबरदस्तीने करावयास लावली जात असत.[४]

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 318 (CCCXVIII) D
ISSN : 2278-9308
September, 2021

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १९२७ च्या प्रारंभीच मुंबई विधानमंडळाचे सभासद म्हणून नेमणूक करण्यात आली. दिनांक १८ फेब्रुवारी १९२७ रोजी त्यांचा शपथविधी झाला.[५] मुंबई कायदे मंडळात महार वतन बिलावरील पहिल्या वाचनाच्या वेळी त्यांनी केलेले भाषण अभ्यासपूर्ण व कायद्याची सर्वांगीण चिकित्सा करणारे व कळकळीने भरलेले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आणलेले हे दुरुस्त बील सर्वसाधारण स्वरुपाचे होते म्हणजे मुंबई इलाख्यातील सर्व प्रकारच्या कनिष्ठ गावकामगारांना लागू होईल असेच होते. पाटील कुलकर्णी वतनदार सोडून राहिलेल्या सर्व समाजाच्या आलुते-बलुतेदारांना लागू होणारे होते. त्या बिलातील दुरुस्त्या सुचवणारी कलमे प्रामुख्याने महार वतनासंबंधीची असल्याने त्या 'बिलास महार वतन बील' असे म्हटले जाते. कुलकर्णी वतने यापूर्वीच रद्द करण्यात आली होती.

महार वतन बिलाचे उद्देश्य:

1. गावकामगारांचे प्रत्यक्ष काम करण्यासाठी अधिक मुशाहिरा देण्यासाठी तरतूद करणे.
2. कनिष्ठ गावकामगाराच्या वतनाचे रुपांतर रयतव्यात करण्यास परवानगी देणे.
3. बलुत्याचे रुपांतर नगदी पैशात करणे.
4. कनिष्ठ वतनदाराने, रयतेची चाकरी केली पाहिजे अशी जी सक्ती होती त्या सक्तीतून त्याची मुक्तता करणे.
5. कनिष्ठ वतनदारांची कामे निश्चित करणे.[६]

महार वतनातील दोष : महार लोकांच्या वतनदारीच्या चाकरीस डॉ. बाबासाहेब आंबेडकर विसाव्या शतकातील गुलामगिरी म्हणत असत. अस्पृश्यतेच्या रुपाने ही गुलामगिरी कित्येक शतके चालू होती. महार वतनाच्या बाबतीत ज्या दुरुस्त्या बाबासाहेबांनी सुचविल्या होत्या त्या त्यांनी "बहिष्कृत भारता"तून प्रकाशित करण्यापूर्वी त्याची चर्चा ते महार जातीतील अनेक सुशिक्षित व अशिक्षित लोकांशी तीन चार वर्ष करीत होते. नांदगाव व रहिमतपूर या दोन ठिकाणी महारकी वतनाचा विचार करण्यासाठी सभा भरवण्यात आल्या होत्या.[७] मुशाहिराची तुटपुंजी रक्कम व महारांना दिलेल्या वतनी जमीनी या कायमस्वरुपी दिल्या आहेत असे सरकार मान्य करत नाही, तर बलुतं हे रयतेकडून मिळवावे लागते. महारांच्या कामासाठी त्यांना रोख मुशाहिरा नाही. बहुतेक गावी त्यांना इनाम जमिनी आहेत त्या जमिनींना हडकी-हाडोळी म्हणतात. ज्या गावी महारांना इनाम नाही त्यातल्या क्वचित गावात त्यांना जागल्याप्रमाणे रोख पाच दहा रुपये सालीना मुशाहिरा सरकार देते. थोडक्यात, महार-जागले त्यांचे पोट सर्वस्वी रयतेकडून मिळणाऱ्या ऐन जीनसी बलुत्यावर चालते.[८]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वतन या शब्दाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "कोणतीही वतनी मालमिळकत असल्यास ती व वंशपरंपरेचा हुद्दा व त्यासंबंधी हक्क व अधिकार हे मिळून वतन होते. महार लोकांची करावयाची कामे निश्चित नव्हती. त्यांना सरकारी कामासोबत रयतेचीही कामे करावी लागत होती व या कामापोटी महारांना सर्वस्वी बलुत्यावर अवलंबून राहावे लागे. तेव्हा बाबासाहेबांनी महार वतनापोटी जे बलुते मिळत होते त्याचे रुपांतर नक्त वेतनात करावे. सरकारी नोकरी पोटी किती बलुते व रयतेची सेवा करण्यापोटी किती बलुते हे ठरवून मिळावे व महार लोकांना ही नोकरी करायची नसेल त्यामधून त्यांना मोकळे होता यावे अशी तरतूद या बिलात केली होती.[९] कामावर किती माणसे नेमायची हेही निश्चित नाही. तसेच, कामाचे तासही निश्चित नाहीत. सरकारच्या अनेक खात्यापैकी कोणत्या खात्याची कामे महारांनी करावयाची हे ही निश्चित नाही, त्याने चोवीस तास कामावर हजर असले पाहिजे, कोणत्या वेळी कोणता अधिकारी येईल आणि बिगार न्यावयास सांगेल याचा नेम नाही. पुरुष हजर नसला तर बायको, बायको नसली तर मुलगा किंवा मुलगी व तिही हजर नसली तर म्हातारा किंवा म्हातारी, कोणी तरी बदली म्हणून काम करण्यास एका पायावर तयार असले पाहिजे मग ते काम कोणत्याही वेळी

येवो. रात्र म्हणता येणार नाही, घरी मयत झाले आहे असे म्हणता येणार नाही. हे सर्व महार लोक निमुटपणे सहन करतात.[१०]

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सुचविलेल्या दुरुत्या :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वतन कायद्यात वरील समस्यांवर सुधारणा सुचविल्या त्या पुढील प्रमाणे होत्या.

1. परघराण्यात गेलेल्या जमिनी काढून मूळ मालकास देणे हे कलेक्टरला भाग पाडले आहे यासाठी ९ व्या कलमास एक नवे कलम जोडण्यात आले आहे.
2. बलुत्याचा हक्क महारांचा महारांनी बजावण्याऐवजी सरकारतर्फे त्याची अमंलबजावणी होऊन महारांचा हक्क पूर्णपणे त्यांच्या पदरात पडावा. हक्काचे रुपांतर नगदीत झाले पाहिजे म्हणजे जे काय मिळायचे ते सरकारी तिजोरीतून नेमक्या वेळी मिळेल. यासाठी १९ व्या कलमास दोन जादा कलमे वतन कायद्यास जोडण्यात आली.
3. दर दहा वर्षांनी महारांना आपले बलुते वाढवून घेण्याचा अधिकार प्राप्त होईल यासाठी कलम २१ मध्ये दुरुस्ती करण्यात आली. ठराविक बलुत्यात वेळोवेळी कारणपरत्वे बढती व्हावी.
4. सरकारी कामाकरीता व रयतेच्या कामाकरीता किती मुशाहिरा याची विभागणी कलेक्टरकडून करून घेऊन आवडेल ते काम करण्याची मुभा देण्यासाठी कलम १९ मध्ये दोन जादा कलमे जोडण्यात आली.
5. १५ व्या कलमात दुरुस्ती सुचवून महारांने महारकी करण्याचे सोडून दिले तर त्याची वतनाची जमीन काढून न घेता त्या जमीनीवर इतर रयते प्रमाणे तो शेतसारा देईल.
6. कलम ८३ मध्ये सुधारणा करून कामासंबंधीचे नियम हल्लीप्रमाणे सरकारने करावेत पण ते कौन्सिलचे संमती शिवाय अंमलात आणू नयेत. कामासंबंधीचे नियम योग्य आहेत किंवा अयोग्य आहेत याची छाननी करण्यास कायदे कौन्सिलातील अस्पृश्य वर्गाच्या सभासदास संधी सापडेल व कायदेशीर कामे कोणती व बेकायदेशीर कामे कोणती हे निश्चित करता येईल.[११]

**महार वतन खालसा करण्याची कारणे :** कोणत्याही अटीवर महार वतन खालसा व्हावे, अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती. या संदर्भात ते “बहिष्कृत भारता”त लिहितात, महारकी चतन खालसा करण्यापेक्षा त्यात सुधारणा करणे बरे असा कोणी प्रश्न करील, आम्ही महार वतनाच्या विरुद्ध आहोत म्हणून महार वतनात सुधारणा करण्यापेक्षा खालसा करणे बरे. कारण महार वतनाचा लोप झाल्याशिवाय महारांची अवनती टळणार नाही. महार वतनात सुधारणा झाली तर अदूरदृष्टी महार जात वतनाचा त्याग करण्यास प्रवृत्त होण्या ऐवजी वतनाला जास्त जास्त चिकटून राहण्याचा संभव आहे. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतन बील व कुलकर्णी वतनाची तुलना केली ती अशी, कुलकर्णी वतन व महार वतनात कोणत्याही प्रकारचे साम्य नाही. एक त्यांच्या धारण करणारांस अधिकाराप्रत पोहोचविते तर दुसरे त्यांच्या धारण करणारांस मनाने तसे शरीराने गुलाम बनविते. जन्माला आला हेला आणि पाणी वाहत मेला, अशी स्थिती महार वतनामुळे महारांची झाली, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले.[१२]

सन १९२७ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बलुतेदारी आणि वतने नष्ट करण्याची भूमिका मांडली. त्यांच्या आग्रही भूमिकेमुळे मुंबई प्रांताच्या सरकारने १९५८ साली वतने नष्ट करण्याचा कायदा पास केला. मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाणांच्या प्रागतिक विचारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वतनदारी नष्ट करण्याच्या चळवळीस पूर्णत्त्व आले.[१३] असे असले तरी महार समाजाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपदेशाने तत्पूर्वीच वतनाचा त्याग केला होता.

निष्कर्ष :

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतन बील मांडताना सामाजिक परिवर्तनाचा उद्देश ठेवला. हा उद्देश ठेवताना त्यांनी महारांनी वतन सोडल्याशिवाय त्यांची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता नाही हे त्यांनी महार वतन परिषदा घेवून व "बहिष्कृत भारता"त लिखाण करून स्पष्ट केले.

2. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचलित समाज व्यवस्थेतील वतनदारी पद्धतीचे सामाजिक सांस्कृतिक व आर्थिक स्वरुपाचे विवेचन केले. या वतनामुळे महारांस सामाजिक अपप्रतिष्ठा प्राप्त होते. त्यांना लाचार व दीनवाणी बनवते, महार वतनाचे स्वरूप हे गाव कामगाराचे आहे. त्याची कामे निश्चित नाहीत, कामाचा मोबदला निश्चित नाही. तेव्हा ते खालसा करावे असा आग्रह त्यांनी धरला.

3. महार जातीने वतनाचा त्याग करून स्वतःचा उत्कर्ष करून घेतला व आत्मसन्मानाचे जीणं स्वीकारले.

संदर्भ :

1. गावगाडा (त्रिंबक नारायण आत्रे) संपा. निसर्गंध प्रभाकर, संपादकीय आवृत्ती २०११, नाग-नालंदा प्रकाशन, इस्लामपूर, पृ. 41.
2. उपरोक्त, पृ. ६९.
3. बहिष्कृत भारत, शुक्रवार ३० सप्टेंबर १९२७.
4. गावगाडा, पृ. ६५.
5. मून वसंत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रकाशक नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया नवी दिल्ली, तिसरी आवृत्ती, 200९, पृ. २3.
6. कांबळे बी. सी. समग्र आंबेडकर चरित्र खंड ६ वा, सुगावा प्रकाशन पुणे, द्वितीय आवृत्ती, २००७, पृ.५२.
7. बहिष्कृत भारत, शुक्रवार ४ नोव्हेंबर १९२७.
8. गावगाडा, पृ. 94.
9. कांबळे बी. सी., समग्र आंबेडकर चरित्र खंड ६ वा, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृती, २००७, पृ. ६७.
10. बहिष्कृत भारत, शुक्रवार २ सप्टेंबर १९27.
11. बहिष्कृत भारत, शुक्रवार ४ नोव्हेंबर १९२७.
12. बहिष्कृत भारत, शुक्रवार ४ नोव्हेंबर १९२७.
13. लुलेकर जी. प्रल्हाद, गावगाड्याचे शिल्पकार, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २००9, पृ. १३.